# प्रभावी चरित्रकार डी.जी.तेंडुलकर

जन्मः **15** ऑगस्ट **1907** मृत्यूः **12** जून **1971**

महात्माजींच्या नेतृत्वाखाली झालेल्या स्वातं>य लढयाच्या इतिहासाचा प्रामाणिक आलेख लिहिणारे डी.जी.तेंडुलकर हे नाव आपल्या ज्ञातीतील एक ‘प्रभावी चरित्रकार’ म्हणून घेतले जाते.महात्मा गांधीजी आणि अब्दुल गफारखान यांचं चरित्रलेखन करणारे लेखक म्हणून ते सर्वज्ञात आहेत.

डी.जी. तेंडुलकर म्हणजे दीनानाथ गोपाळ तेंडुलकर. दिनू किंवा डी.जी. या नावाने त्यांना ओळखले जात होते.स्वातं>यपूर्व काळात सावंतवाडी संस्थानात मोडणा-या तेंडोली गावी एका मध्मम वर्गीय कुटुंबात त्यांचा जन्म झाला.स्वातं>य प्राप्तीनंतर संस्थाने भारतात विलीन झाली आणि सावंतवाडी हा रत्नागिरी जिल्हयातील एक तालुका बनला.कालांतराने कुडाळ प्रांत म्हणून या प्रदेशाची ओळख झाली.

त्यांचे वडील गोपाळराव यांनी लहान वयातच तेंडोली गाव सोडले आणि ते वडील बंधूकडे मुंबईस रहाण्यास आले.सातवी परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर शिक्षक म्हणून नोकरीस लागले. ‘ दादा मास्तर ’ या नावाने ते परिचित होते.त्यांची आई विठाक्का या अवसरे घराण्यातील एका जमिनदाराची कन्या.गोपाळराव- विठाक्का यांच्या तीन मुलांपैकी डी.जी.हे सर्वात लहान. **15** ऑक्टोबर **1907** साली जन्मलेला दिनू धोबीतलाव येथे एल्फिस्टन हायस्कूलमध्ये शिकत असताना **1919** साली विठाक्का कॉल-याच्या साथीला बळी पडल्या आणि एका रात्रीत त्यांचं अचानक निधन झालं.रात्री नेहमीप्रमाणे झोपलेली आई सकाळी उठलीच नाही हा मोठा धक्का छोटया मुलांना व या कुटुंबाला सहन करावा लागला.

पत्नीची साथ सुटली त्याच दरम्याने गोपाळराव निवृत्त झाले . परिस्थिती यथातथाच असली तरी त्यांची दीनूला शिक्षण देण्याची आणि दीनूची स्वतः शिकण्याची इच्छा मात्र जबरदस्त होती. म्हणूनच निवृत्तीनंतर मिळणा-या तुटपुंज्या पेन्शनला पूरक असे उत्पन्न

मिळवण्यासाठी कुठेतरी हिशोबनिसाचे काम करीत होते. एकंदरीत काय तर अत्यंत कठीण परिस्थितीशी सामना करीत गोपाळराव व त्यांच्या मुलांनी मुंबईतच आयुष्य काढलं. **1928** साली एल्फिस्टन कॉलेजमधून बी.ए.ची परीक्षा देऊन दीनू म्हणजेच डी.जी. बाहेर पडले. त्यांना परिक्षेत दुसरी श्रेणी मिळाल्याचे जाहीर झाले होते पण शाळेतील गणिताचे प्राध्यापक पी. एस. कट्टी यांचा या निकालावर विश्र्वास बसला नाही .डी.जी. यांची गणित विषयातील असामान्य बध्दीमत्ता त्यांना ठाऊक असल्याने पुन्हा उत्तर पत्रिका तपासण्यात आल्या. तेव्हां एका संपूर्ण विभागाचे गुण बेरजेत धरावयाचे राहून गेल्याचे लक्षात आले आणि फेरतपासनी नंतर डी.जी. प्रथम श्रेणीत पास झाल्याचा निकाल जाहीर झाला. असा गाढा विश्र्वास विद्यार्थ्यांवर असणारे शिक्षक त्याकाळी होते तर शिक्षकाचा आपल्या बद्दलचा विश्र्वास सार्थ करणारे विद्यार्थीही होते ही नोंद आजच्या तरूणांनी घेणे अधिक महत्वाचे वाटते.

डी.जी. यांना इंग्लंडला जाऊन केंब्रिज विद्यापीठातून गणित विषयातील रॅंग्लर पदवी मिळवण्याची तीव्र इछा होती. पण आर्थिक गणित जमवणं शक्यच नव्हतं. वडिलांनी कसंबसं ओढग्रस्त परिस्थितीत बी.ए.पर्यंतचं शिक्षण दिल्याची जाणीव डी.जी. यांना होती. पण मुलाच्या शिक्षणासाठी झपाटलेल्या गोपाळरावांनी मुलाच्या मदतीने शिष्यवृत्ती मिळविण्यासाठी कसोशीने धडपड केली. तेंडुलकर घराण्यातील एक हितचिंतक, प्रा. न.र.फाटक, अनंत शिवाजी देसाई टोपीवाले अशा अनेकांनी मदतीचा हात दिला आणि **1929** साली डी.जी. यांनी विलायतेस पदव्युत्तर शिक्षणासाठी उड्डाण केलं. विशेष बाब म्हणजे जागतिक किर्तीचे शास्त्रज्ञ डॉ.जयंत नारळीकर यांचे वडील श्री. नारळीकर आणि डी.जी. एकाच वर्गात शिक्षण घेत होते. पुढे नारळीकर यथासांग शिक्षण पूर्ण करून रॅंग्लर झाले तर राष्ट्रीय बाणा असलेले डी.जी. हातातोंडाशी आलेली परीक्षा सोडून मायदेशी परतले ते केवळ गांधीजींच्या हाकेला ‘ओ’ देणं हे आद्यकर्तव्य मानून. म्हणजे एकंदरीत डी.जे.यांनी **1929** ला विलायतेत पाऊल ठेवलं, अभ्यास सुरू केला आणि शैक्षणिक वर्ष संपण्याआधीच **1930** साली परत आपली मायभूमी ,भारत देश गाठला.

भारतात परतल्यावर  ते सत्याग्रहाच्या चळवळीत सामील झाले. भूमिगत राहून आघाडीवर लढणा-या अनेक देशभक्तांना मदत करण्याचं  काम  हाती घेतलं. खास मित्र यूसफ मेहरअली यांनी सुरू केलेल्या ' वानर सेना ' या तरूणांच्या स्वातं>य संघटनेत मोलाचं कार्य केलं. मेहरअली यांना तुरूंगवासाची शिक्षा झाली असता वानर सेनेचं नेतृत्व केलं. पण प्रत्यक्षात चळवळीला हिंसक रूप येत असल्याचं पाहून गांधीजींनी चळवळ मागे घेतली आणि  डी. जी. अभ्यास पूर्ण करण्यासाठी पुन्हा इंग्लंडला गेले.

परंतु खादीचा पेहराव केलेल्या  तेंडुलकरांसाठी ते वातावरण फारच प्रतिकूल असल्याने ते इंग्लंड सोडून जर्मनीला गेले आणि नॉटिंजन विद्यापीठात  प्रवेश घेतला. **1935** साली गणित विषयात ट्रायपॉस मिळवला पण डॉक्टरेट मिळवावी या विचाराने  त्यांनी शिक्षण चालूच ठेवलं. परंतु जर्मनीत नाझींची राजवट होती. त्यामुळे रशियन  राजवटीच्या बाजूने बोलणा-यांना  व ज्यू  लोकांना पकडून तुरूंगात डांबलं जात होतं. तेंडुलकर कम्युनिस्ट विचारसरणीचे आहेत ही बातमी जर्मनीच्या पोलिस यंत्रणेपर्यत पोहचली आणि तेंडुलकारांना तुरूंगात टाकण्यात आलं. कॉलेजच्या प्राध्यापकांच्या मदतीमुळे ते दहा दिवसांचा तुरूंगवास भोगून एकदाचे सुटले. त्या दहा दिवसात झालेल्या अमानुष छळाला कंटाळून तेंडुलकरांनी गणिताच्या  अभ्यासाचं  वेड डोक्यातून काढून टाकलं आणि ते रशियास गेले. 'माझी नाझी तुरूंगातील दहा वर्षे' हे  पहिले पुस्तक  इंग्रजी भाषेत लिहिले जे प्रथम लेख स्वरूपात  आणि नंतर त्याचे मराठी रूपांतर होऊन प्रसिध्द झाले.

काहीही झालं तरी पुढे पुढे शिकत रहाण्याची त्यांची इच्छा काही कमी झाली नाही. रशियात आल्यावर अभ्यासाचं स्वरूप बदललं. गणिताची दारे बंद झाली आणि सिनेफोटोग्राफीच्या क्षेत्रात रशियाने केलेली प्रगती पाहून ते या क्षेत्राकडे वळले. बुध्दी अत्यंत तल्लख असल्याने लवकरच छायाचित्रकार म्हणून त्यांनी  प्रावीण्य मिळवलं. कॅमेरामन म्हणून  नोकरीही  चांगली नोकरीही केली. पण केवळ नोकरी करणं, परदेशात राहून चैन करणं हा विचार त्यांनी कधीच केला नव्हता. त्यामुळे छायाचित्रकार म्हणून अव्दितीय यश मिळवूनही अडीच वर्षानंतर ते भारतात परतले. भारतात मिळालेली

चांगल्या पगाराची नोकरी सोडून तेंडुलकरांनी इंग्रजी पत्रकारितेच्या क्षेत्रात प्रवेश केला. 'रशियातील तीस महिने' हे इंग्रजी भाषेतून पुस्तक लिहिलं. कर्नाटक छापखान्याचे मालक मंगेश कुलकर्णी यांनी ते छापून दिलं. ते पुस्तक फारच लोकप्रिय झालं आणि केवळ इंग्रजी नव्हे, तर प्रादेशिक भाषांतही त्याची भाषांतरे झाली. या लेखनाबरोबरच राष्ट्रीय चळवळीतील एक सैनिक म्हणून तेंडुलकर काम करीतच होते.

रशियात अडीच वर्षे राहिल्यामुळे तिथल्या लोकांबदल , एकंदर कामगार चळवळीबद्दल आस्था वाटत होती. म्हणूनच त्यांना रशियन डी. जी. असेही नाव पडलं होतं. ब्रिटनने जेव्हां जर्मनी विरूध्द युध्द पुकारलं आणि जागतिक महायुध्द युध्द सुरू झालं तेव्हांही तेंडुलकरांना पकडून तुरूंगात ठेवण्यात आलं होतं. पुढे जेव्हां ब्रिटन हे रशियाचे दोस्त राष्ट्र आहे म्हणून तेंडूलकर युध्दात पडले हे समजलं तेव्हां त्यांची सुटका करण्यात आली होती.

**1942** साली महात्माजींनी 'भारत छोडो' हा अखेरचा पुकारा केला तेव्हां तेंडुलकरांची सुटका झालेली होती. भारतातील पहिल्या फळीचे सर्वच नेते तुंरूगात अडकले होते. जे तुरूंगाच्या बाहेर होते त्यांना भूमिगत होऊन स्वातं>याची ज्योत पेटती ठेवणं भाग होतं. तेंडुलकरांनी या राष्ट्रीय आंदोलनात कर्तव्य बुध्दीने भाग घेतला आणि **407** काळबादेवी रोडवरील आपल्या घरात अनेक भूमिगतांना आश्रय दिला. याच वर्षी त्यांच्या वडिलांचं निधन झालं आणि ते एकटे झाले.

**1944-45** साली जागतिक युध्द संपलं आणि तुरूंगात डांबलेले सर्व लहानथोर देशवासी मुक्त झाले. त्यानंतर आजवरच्या चळवळीचे प्रणेते महात्माजी यांच्या जीवनपटावर एक पुस्तक लिहिण्याचा विचार पुढे आल. तेंडुलकरांनी या गौरव ग्रंथाच्या लेखनाची व संपादनाची तयारी दर्शवली. नॅशनल हेरडचे संपादक चलपती राव, विठ्ठल झवेरी आणि मृणालिनी साराभाई यांनी तेंडुलकरांना संपादन कामात सहाय्य करण्याचं मान्य केलं. महात्माजी तेंडुलकरांना ओळखत होते. त्यांच्या लेखनाची पध्दत जाणत होते. त्यामुळे

त्यांची परवानगी घेताना कोणतीच अडचण आली नाही. फक्त 'मला लेखन वाचायला दिल्याशिवाय प्रेसला पाठवायचं नाही' ही महात्माजींची अट स्वीकार करावी लागली.

महात्माजींच्या जीवनाचे सर्व धागे जुळवण्यासाठी तेंडुलकरांना खूपच भ्रमंती करावी लागली. अनेक ग्रंथांचा अभ्यास करणं ,पत्रव्यवहार, जुन्या वर्तमानपत्राचे अंक, सरकारी फायली असा  दस्तऐवज जमा करून भरपूर अभ्यास करावा लागला. मुंबई विद्यापीठ ग्रंथालय, एशियाटीक लायब्ररी, सचिवालयातील ऑफिस नोंदी घेऊन  त्यांची नक्कल प्रत संग्रही घेणे अशा कामासाठी लागणा-या पैशासाठी  सहका-यांकडून मदत घ्यावी लागली. त्या मित्र वर्गापैकी 'सकाळ ' चे संस्थापक व संपादक डॉ. ना. वि. परूळेकर हे प्रमुख होते. **1947** साली लेखनास प्रारंभ करण्यात आला. प्रत्येक खंड लिहून झाला की गांधीजी तपासून देत होते. साधारणपणे पाचशे पानांचा एक असे  एकुण आठ खंड तेंडुलकरांनी लिहिले.

दुर्दैवाची गोष्ट म्हणजे  शेवटचा आठवा खंड लिहीत असताना महात्माजींचा खून करण्यात आला. पण  गांधीजींचे पट्ट शिष्य पंडित नेहरूजींनी स्वतः वाचून तपासून दिल्यामुळे चरित्रग्रंथाच्या आठही भागांचे काम पूर्ण झाले . टाईम्स ऑफ इंडियाच्या प्रकाशन विभागाने पन्नास हजाराची अनामत रक्कम घेऊन ग्रंथाची अतिशय सुरेख, तेंडुलकरांना  अपेक्षित होती तशीच छपाई करून त्यांच्या कार्याला व महात्माजींच्या व्यक्तिमत्वाला योग्य न्याय दिला. 'महात्मा' या नावाने आठही खंड  छापून एकाचवेळी प्रकाशित करण्यात आले. तेंडुलकरांची विचारधारा अशी होती की, "हा चरित्रग्रंथ  महात्माजींचा नसून त्यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनतेने पन्नास वर्षे जो स्वातं>य प्राप्तीसाठी लढा दिला त्या लढयाचा हा इतिहास आहे." पहिल्या आवृत्तीच्या चार हजार प्रती विकल्या गेल्या तेव्हां केंद्र सरकारच्या प्रकाशन विभागाने दुसरी आवृत्ती काढली व ती सुध्दा हां हां म्हणता संपली. इथे एक गोष्ट आवर्जून नमूद करायला हवी की,महाराष्ट्र टाईम्सला द्यावयाची मोठी रक्कम त्यांच्या दहा मित्रांनी प्रत्येकी पाच हजाराचे सहाय्य केल्यामुळेच  पुस्तक  तयार झालं होतं . ते मित्र नसते तर आपल्या ज्ञातीतील एवढा मोठा  असा प्रतिभावंत चरित्रकार

नावारूपाला आला नसता. खरोखरच त्याकाळी असलेली मैत्री व एकमेकांवरचा विश्वास किती गाढा होता याचा प्रत्यय येतो. आज हा 'विश्वास' पानीपतच्या युध्दात जमीनदोस्त झाला असेच दिसून येते.

महात्मा गांधीजींच्या पुस्तकाला मिळालेली विलक्षण लोकप्रियता पाहून अनेक चरित्रे लिहिण्याची त्यांना विनंती करण्यात आली परंतु महात्माजींचे चरित्र लिहिले ते केवळ त्यांच्याविषयी वाटणाऱ्या आत्यंतिक आदरामुळे. थोरामोठयांची चरित्रे लिहून पैसा कमावणं हा विचार त्यांनी केलाच नव्हता. त्यामुळे तेंडुलकरांनी सर्वांना नम्रपणे नकार दिला.

परंतु खान अब्दुल गफार खान ऊर्फ फ्रंटीयर गांधी यांचा भारताच्या फाळणीनंतर अनन्वित छळ झाला होता. त्यांचे कार्य महात्माजींपेक्षा मोठे असूनही ते दुर्लक्षित राहिले होते. तेव्हां त्यांचं चरित्र लिहायला हवं अशी त्यांना मनाने ग्वाही दिली. म्हणून फ्रंटीयर गांधी यांचं पाचशेपन्नास पानांचे चरित्र **1967** साली तेंडुलकरांनी लिहिलं. 'गांधी पीस फाऊंडेशन' आणि 'पॉप्युलर प्रकाशन' या दोन संस्थांच्या संयुक्त विद्यमाने ते चरित्र प्रसिध्द झालं. या पुस्तकामुळे पठाणांच्या प्रश्नाकडे लक्ष वेधण्याचं मोठं कार्य तेंडुलकर यांच्या हातून घडलं.

'गांधी इन चंपारण्य' हे पुस्तक लिहून महात्मा गांधीजींच्या चंपारण्यातील कार्याचा अधिकृत परिचय तेंडुलकरांनी करून दिला.

वडिलांसोबत बालपणापासून **407** काळबादेवी रोडवर रहात असलेल्या चाळीचा काही भाग काही वर्षांनी कोसळला तेव्हां भूमिगतांच्या पदस्पर्शाने पावन झालेली ती खोली तेंडुलकरांना सोडणं भाग पडलं. पंडितजींनी जागा दिल्यामुळे वाळकेश्वरला त्यांनी एक बंगला बांधला ज्याला स्वभावानुसार 'एकांत' असं नाव दिलं. त्यांची राहणी इतकी साधी होती की हे गृहस्थ इंग्लंड, जर्मनी, रशिया या परदेशांत राहून आले आहेत हे कोणाला सांगूनही पटत नसे. ते गणिताचे स्कॉलर होते. त्यांचं लेखन अगदी मुद्देसूद व आटोपशीर असे. त्यात फाफटपसारा नसे. बागबगीच्याची त्यांना विलक्षण आवड होती. हिंदुस्थानी व पाश्चिमात्य संगीताची आवड असल्याने बऱ्याच रेकॉडस्‌चा संग्रह त्यांच्यापाशी होता. देश-परदेशात

भरपूर प्रवास केलेला असल्याने त्या ठिकाणच्या संस्कृतीचं द्योतक असलेल्या अनेक दुर्मिळ वस्तू त्यांनी खरेदी केलेल्या होत्या. लेखन, फोटोग्राफी, सच्ची ज्वलंत देशभक्ती आणि एकांत प्रियता या गुणांमुळे ते अविवाहित राहिले.

**1971** साली मोटर सायकलच्या धक्क्यामुळे पाठीच्या कण्याला झालेलं जबर दुखापतीचं दुखणं वैद्यकीय उपचार करूनही बळावत गेलं आणि शेवटी **12** जून **1971** साली डी.जी. देशमुख यांनी सर्वांचा अखेरचा निरोप घेतला.त्यांचे स्वीय सचिव कु.अनु बंडोपाध्याय यांनी तेंडुलकरांना अखेरच्या क्षणापर्यंत साथ दिली.

तेंडुलकरांच्या निधनानंतर त्यांची अनेक मराठी व इंग्रजी पुस्तके आणि त्यांनी केलेला पुस्तक संग्रह न्यू दिल्ली येथील 'त्रिमूर्ती ग्रंथालय'ला भेट म्हणून देण्यात आला.ती पुस्तके 'तेंडुलकर कॉर्नर' या नावाने स्वतंत्र जागी ठेवण्यात आलेली आहेत.तसेच त्यांच्या गाण्यांचा संग्रह मुंबईच्या 'अकॅडेमिक कल्चरल सेंटर'या संस्थेला भेट म्हणून देण्यात आला.

डी.जी. तेंडुलकर यांच्या स्मृतीप्रित्यर्थ मुंबई मराठी पत्रकार संघाने लोणावळे येथे ' दि .गो.तेंडुलकर स्मृती मंदिर ' ही दुमजली इमारत बांधली.**11** एप्रिल **1976** रोजी त्यावेळचे परराष्ट्र मंत्री माननीय यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आलं होतं. या वास्तूत काही पत्रकार मंडळीची तात्पुरती रहाण्याची व्यवस्था आजही असल्याने पत्रकारांच्या सहली व समारंभ तिथे होत असतात.पत्रकारांना त्यांची चिरकाल आठवण राहो हा यामागील उद्देश आहे.

आपल्या कुडाळ देशकर गौड ब्राह्मण ज्ञातीत अशी माणसे जन्माला आली हे आपले भाग्य आहे. अशा या थोर छायाचित्रकार, पत्रकार, चरित्रकार तेंडुलकरांना आमचा दंडवत !